# मुंबई विद्यापीठ

संदर्भ क्र.
रासेयो/ईसीडी/२०२४-२५/९८४
दिनांक : १७.१०.२०२४

## परिपत्रक

विषय: महाविद्यालयामध्ये नव-मतदार नोंदणी व मतदान जनजागृती उपक्रम राबविण्याविषयी.

मा. महोदय/महोदया,

लोकशाही समाजरचनेमध्ये मतदानाला अनन्य साधारण महत्व आहे. मतदान हा नागरीकांचा मुलभूत अधिकार आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी १८ वर्षावरील सर्व नागरीकांनी मतदान आवश्यक आहे. त्यासाठी १८ वर्षावरील सर्व नागरीकांना मतदाता म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांमार्फत नवमतदार नोंदणी व मतदान जनजागृती उपक्रम प्रामुख्याने राबविण्यात यावा.

महाविद्यालय स्तरांवर नवमतदार नोंदणी मोहिमे अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात यावेत व समाजामध्ये मतदानाचा हक्क बजावण्याकरीता जनजागृती करण्यात यावी.

महाविद्यालयामध्ये मतदान जनजागृती व नव-मतदार नोंदणी यासंदर्भात खालील प्रमाणे उपक्रम राबविण्यात यावेत.

- शहर/गावांतील महाविद्यालयातील १८ वर्षे पुर्ण झालेल्या नव-मतदारांना नावनोंदणी करण्यात प्रोत्सोहित करावे.
- दत्तक वस्ती/गांव, खेडे महाविद्यालया नजिकची वस्ती इत्यादी मध्ये नवमतदार नोंदणी अभियान राबविण्यात यावे व मतदान जागृकता निर्माण करावी.
- याबाबत नजिकच्या निवडणूक कार्यालय/अधिकारी यांची मदत घ्यावी.
- नव-मतदारांना मतदान नोंदणी फॉर्म भरण्यासाठी मदत करावी.
- महाविद्यालयामध्ये नव-मतदारांना नावनोंदणी करण्यासाठी आवश्यकती व्यवस्था करावी.
- याबाबत संबंधीत निवडणूक कार्यालयातील अधिकारी यांना व्याख्यानासाठी महाविद्यालयात आमंत्रीत करावे.
- आवश्यकतेनुसार पोस्टर/ भिंत्ती चित्रे/ मतदार नोंदणी बाबतचे इतर साहित्य संबंधीत नजीकच्या निवडणूक कार्यालयातून आणून महाविद्यालयात प्रदर्शन लावणे.
- प्रभातफेरी/रॅली/पथनाटय इत्यादी द्वारे नवमतदार नोंदणी व मतदान जगजागृती करण्यात यावी.

कृपया वरील संदर्भात त्वरीत कार्यवाही करावी.

श्री. सुशील शिंदे
विशेष कार्य अधिकारी,रा.से.यो.

डॉ. सुनिल पाटील
संचालक, विद्यार्थी विकास विभाग

प्रति,
मा. प्राचार्य, मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.